# ई - पोलीस पत्रिका

दि १८/०३/२०२० अनु.क्र.५७

## (अमरावती शहर पोलीसांची २०२० ची उद्दिष्टे)

- जागरूक व तत्पर पोलीस.
- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/ रजा

**१.क्रमांक :-पोआअ/पशा-१/रजा पोलीस अधिकारी/१९४८/२०२० अमरावती दिनांक. ०४.०३.२०२०**

## आदेश

अमरावती शहर या पोलीस घटकातील पोलीस स्टेशन/शाखेमधील खालील नमुद पोलीस अधिकारी त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधीत यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे रजा मंजुर करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अधिकारी यांचे नाव व पदनाम | नेमणुक | रजा मंजुरीचा प्रकार | रजा मंजुरीचा कालावधी | साप्ताहीक रजा | रजा मंजुरीचे कालावधीत अतिरीक्त कार्यभार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सपोआ सोहेल शेख | फ्रेजरपुरा विभाग | अर्जीत रजा | दि.०३.०३.२०२० ते ०७.०३.२०२० | --- | सपोआ सुहास भोसले, राजापेठ विभाग |
| २ | सपोआ बि.डी.डाखोरे | गुन्हे शाखा विभाग | अर्जीत रजा | दि.०५.०३.२०२० ते ०७.०३.२०२० | ०८.०३.२०२० | पोनि.कैलास पुंडकर गुन्हे शाखा |
| ३ | पोउपनि.राजेन्द्र गुलतकर | कोतवाली | अर्जीत रजा | दि.०४.०३.२०२० ते १८.०३.२०२० | --- | |

०००

**२.क्र.पोआअ/आस्था-रजा/आज्ञांकीत कक्ष/सिक हजर/२७०२/२०२० अमरावती दि.२७.०२.२०२०**

## आदेश

खालील नमुद पोलीस कर्मचारी हे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कालावधीमध्ये आजाराच्या कारणास्तव कर्तव्यावर अनुपस्थित राहील्याने त्यांना कर्तव्यावर हजर करुन घेण्यासाठी दिनांक २७.०२.२०२० रोजी पोलीस उपायुक्त,(मुख्यालय) अमरावती शहर यांचे समक्ष आज्ञांकीत कक्षेत हजर करण्यात आले आहे.त्याअनुषंगाने सदर पोलीस कर्मचारी यांना दिनांक २७.०२.२०२० रोजी पासून कर्तव्यावर हजर करावे.

| अ.क्र. | पदनाम/ब.न. | कर्मचाऱ्याचे नाव | नेमणुक | रुग्णनिवेदन कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | मपोना/१०८० | शोभा टाले | पो.स्टे.वलगाव | दि.०४.०२.२०२० ते २७.०२.२०२० पर्यंत २४ दिवस अर्जित रजा म.ना.से.(रजा) नियम मधील ५० तरतुदीप्रमाणे मंजूर |

०००

**३.क्रमांक :-पोआअ/पशा-३/परिवर्तीत रजा मंजुरी/१९२०/२०२० अमरावती दि.०३.०३.२०२०**

## आदेश

**विषय :- परिवर्तीत  रजा मंजुरीबाबत**

पोलीस आयुक्त अमरावती  शहर या पोलीस घकातील खालील नमुद कर्मचारी  यांचा नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे वैद्यकीय  कारणाने महाराष्ट्र नागरी  सेवा ,रजा नियम १९८१ मधील ६१ अन्वये परिवर्तीत रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचारी यांचे नाव पदनाम | सध्याची  नेमनुक | वैद्यकीय कारणाने परिवर्तीत रजा मंजुरी कालावधी |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती के.एम.राऊत प्रमुख लिपिक | प्रबंधक शाखा | ०१.०२.२०२० ते १०.०२.२०२० -१० दिवस |

०००

## शिक्षा/विभागिय चौकशी/

**४.क्रमांक :-पोआअ/विचौ-१/गु.का.गहाळ/अ.आ./ना.पो.शि.१४४ देवरे/२०६५/२०२० अमरावती दि.०९.०३.२०२०**

## आदेश

कसुरदाराचे नाव :- ना.पो.शि.११४४ पुरुषोत्तम  केळुजी  देवरे पो.स्टे.बडनेरा,अमरावती शहर
थोडक्यात  कसुरी :-

तुम्ही ना.पो.शि.११४४ पुरुषोत्तम  केळुजी  देवरे पो.स्टे.बडनेरा,अमरावती शहर येथे नेमणुकीस असतांना अप.क्र.२८१/२००७ क.४२०,४६८,४७१ भा.द.वि.चा गुन्हा दाखल झाला होता.त्याचा प्राथमिक तपास पोउपनि प्रथमेश आत्राम यांनी  केला आहे.त्यानंतर सदर तपास आपणाकडे देण्यात आला होता.तपासा दरम्यान जप्त केलेले वादग्रस्त दस्ताऐवज,नमुद दस्ताऐवज असे परिक्षणाकरीता मा.सहाय्यक संचालक हस्ताक्षर तज्ञ,गुन्हे अन्वेषण विभाग,नागपुर यांचे कार्यालयात सादर केले होते.सदर वागग्रस्त दस्ताऐवजामध्ये काही त्रुटी असल्याने त्रुटीची पुर्तता करणेकामी परत आले होते.पोउपनि नितिन उईके यांनी त्रुटीची पुर्तता करुन  दिनांक ०८/०७/२००८ रोजी गुन्हे शाखा मार्फत मा.सहाय्यक संचालक, हस्ताक्षर तज्ञ गुन्हे अन्वेषण विभाग, नागपुर यांचे कार्यालयात परत पाठविले होते.त्यानंतर सदर गुन्हयात आरोपी विरुध्द दोषारोप पत्र न्यायालयात सादर केले होते.पोउपनि उईके यांचे माहे जुन २०१० मध्ये पोलीस स्टेशन गाडगे नगर येथे बदली झाल्याने  ते गाडगे  नगर येथे रुजु झाले .सदर वादग्रस्त दस्ताऐवज मा.सहाय्यक संचालक हस्ताक्षर तज्ञ गुन्हे अन्वेषण विभाग ,नागपुर यांचे कार्यालयातुन तपासणी करुन अहवालसहीत  गुन्हे शाखा येथे प्राप्त झाले

होते.परंतु तेव्हा पोउपनि उईके हे राजापेठ कर्तव्यावर नसुन ते पो.स्टे.गाडगे नगर येथे कर्तव्यावर होते. सदर दस्ताऐवज नापोशि/११४४ पुरुषत्तोम देवरे यांनी त्यांना दिले नसल्याने आपले खुलासामध्ये सांगतात

तसेच नापोशि/११४४ पुरुषत्तोम देवरे यांनी दिनांक ३०/१०/२०११ रोजी सदर गुन्हयातील वादग्रस्त दस्ताऐवज व अहवाल गुन्हे शाखा अमरावती येथुन पो.स्टे.राजापेठ येथे आणुन स्टेशन डायरी नोंद करुन पोउपनि नितीन उईके यांना दिल्याचे सांगत आहे.परंतु दिनांक ०४/१०/२०११ रोजीची स्टेशन डायरी ची पाहणी केली असता त्यामध्ये वादग्रस्त दस्ताऐवजाची कुठलीही नोंद नापोशि/११४४ पुरुषत्तोम देवरे यांनी घेतल्याची दिसुन आली नाही. तसेच कोर्टामध्ये जावुन दोषारोपाची पाहणी केली असता त्यामध्ये सुध्दा वादग्रस्त दस्ताऐवज लावल्याचे दिसुन आले नाही.

असा प्रकारे तुम्ही कर्तव्यात निष्काळजीपणा व बेजबाबदारपणा करुन अप.क्र.२८१/२००७ क.४२०,४६८,४७१, भादवि चा गुन्हातील महत्वाचे दस्तऐवज गहाळ केल्याचे प्राथमिक दर्शनी दिसुन येते.असा प्रकारे कर्तव्यात तुमच्या या बेशिस्तपणाचे कसुरीबददल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम ३ पोटनियम (२) मधील (५) च्या प्राधिकारानुसार देय वार्षीक वेतनवाढ एक वर्षाकरीता का रोखण्यात येवु नये म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदरची नोटीस स्विकारुन आपण स्पष्टीकरण सादर केले आपण सादर केलेले स्पष्टीकरण समाधानकारक न वाटल्याने आपणास दिनांक ०५/०३/२०२० रोजी मा.पोलीस आयुक्त ,अमरावती शहर यांच्या आज्ञांन्कीत कक्षात आपले मौखीक म्हणणे ऐकुण घेण्याकरीता बोलविण्यात आले होते.नोटीसमध्ये देण्यात आलेली शिक्षा कायम ठेवुन खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

उपरोक्त कसुर प्रकरणी नापोशि/११४४ पुरुषत्तोम केळुजी देवरे ,नेमणुक पो.स्टे.बडनेरा अमरावती शहर .यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ नियम क्रमांक ३ मधील (२) चे (५) च्या प्राधिकारानुसार **वार्षीक वेतनवाढ एक (१) वर्षाकरीता (परिणामशिवाय) रोखण्याची शिक्षा ही शिक्षा** कायम करण्यात येत आहे.

तुम्ही जर सदर शिक्षेमुळे व्यथित होत असाल तर सदरचा आदेश प्राप्त झाल्याचे दिनांकापासुन ६० दिवसाचे आत योग्य त्या मार्फतीने मा.पोलीस महासंचालक , महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अपील सादर करु शकता.

०००

# वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा

सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नांव पोलीस स्टेशनचे नोटीस बोर्डवर लिहुन हार्दीक शुभेच्छा द्याव्यात.

| **अ.क्र.** | **हुददा** | □.□□ | □□. **व कर्म. यांचे नांव** | **नेमणुक** □□.**स्टे.** | **दिनांक** |
|---|---|---|---|---|---|
| **०१** | पोशि | १८५३ | धिरज पाटील | पोलीस मुख्यालय | १८/०३/२०२० |

**(लक्ष्मण भोगण )**
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
पोलीस आयुक्त,अमरावती शहर करिता

प्रत,

पत्रव्यवहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक , आस्थापना शाखा/सीसीटीएनएस कक्ष यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता